- फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम ३५७ नुसार सदर गुन्हा घडलेला असून तो आरोपीने केलेला आहे व तो गुन्हेगार आहे हे सिद्ध झाल्यावर निकालामध्ये न्यायालयाकडून नुकसान भरपाई म्हणून गुन्हेगाराने दंड भरण्याचे आदेश दिले जाऊ शकतात.
- फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम ३५७ ब नुसार पिडीत व्यक्तीला सर्वसमावेशक योजना (umbrella scheme) अंतर्गत स्त्रीला संरक्षण व सबलीकरणासाठी जरी आर्थिक स्वरूपाची नुकसान भरपाई मिळाली असेल तरी न्यायालयाच्या आदेशानुसार नुकसान भरपाई म्हणून गुन्हेगाराने भरलेला दंड ही पिडीत व्यक्तीला मिळू शकतो.
- अत्याचाराला सामो-या गेलेल्या व्यक्तीचा मृत्यू झालेला असल्यास नुकसान भरपाई जवळच्या नात्यातील नातेवाईकाला दिली जाते.

सेहत


**सेंटर फोर एनक्वायरी इनटू हेल्थ ऐंड अलाईड थीम्स्**

सर्वे नं. २८०४ व २८०५ आराम सोसायटी रोड,

वाकोला, सांताक्रुज - पूर्व, मुंबई : ४०००५५.

टेल. नं. २६६७३५७१/२६६७३१५४ फॅक्स:२६६७३१५६


ई - मेल: cehatmumbai@gmail.com

वेबसाईट: www.cehat.org




# लैंगिक अत्याचाराची प्रकरणे हाताळताना अनुसरण्याच्या प्राथमिक कार्यपद्धती ः मार्गदर्शक सूचना

**[समर्थक गट (Support Groups) व इतरांकरता]**



सदर माहितीपत्रिका अशा व्यक्तींकरता आहे ज्यांना लैंगिक अत्याचाराला सामोरे गेलेल्या/पिडीत व्यक्तींना न्याय मिळवून देण्याकरता मदत करण्याची इच्छा आहे. लैंगिक अत्याचार झालेल्या व्यक्तीच्या मनावर अत्याचारामुळे जबरदस्त आघात झालेला असतो. या धक्क्यातून सावरून व्यक्तीने सक्षम होण्याकरता त्यांना तातडीने मानसिक आधार व सामाजिक पाठिंबा मिळण्याची तरतूद करणे अतिशय आवश्यक असते.

सदर माहितीपत्रिकेचा मुख्य उद्देश लैंगिक अत्याचार पिडीत व्यक्तींना मदत करणा-यांना वैद्यकिय, पोलिस व न्याय व्यवस्थेशी संबंधित प्राथमिक कार्यपद्धती स्पष्ट करून सांगणे असा आहे. ज्यामुळे पिडीत व्यक्तींना मदत करणा-यांना कायद्याची अंमलबजावणी करणा-या संस्था व पिडीत व्यक्ती या दोघांचेही हक्क माहित होतील.

***हॉस्पिटल ः***

- फौजदारी प्रक्रिया संहिता ३५७ क अन्वये (फौजदारी कायदा दुरूस्ती २०१३) सार्वजनिक व खाजगी दोन्ही प्रकारच्या हॉस्पिटलमध्ये लैंगिक अत्याचार झालेल्या व्यक्तीला मोफत उपचार मिळायला हवेत. पोलिसांकडून परवानगी मिळाली नसल्याच्या कारणावरून किंवा प्रथम खबरी अहवाल दाखल केला नाही म्हणून सदर व्यक्तीवर उपचार करण्यास नकार देता येणार नाही. लैंगिक अत्याचार झालेल्या व्यक्तीचे न्याय वैद्यक परिक्षण (Medico

legal Examination) व उपचार करण्यास नकार दिल्यास भारतीय दंड संहिता कलम १६६ ब अन्वये १ वर्षापर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.

- अत्याचाराला सामोरे गेलेल्या व्यक्तीचे परिक्षण कुठल्याही नोंदणीकृत वैद्यकिय अधिकारी/डॉक्टरांमार्फत केले जाऊ शकते (कलम १६४ (अ) फौजदारी प्रक्रिया संहिता) याचाच अर्थ सदर परिक्षण खाजगी हॉस्पिटल मध्येही करता येऊ शकते.

- अत्याचार पिडीत व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार वैद्यकिय मदत व उपचाराकरता स्वतः किंवा पोलिसांकरवी हॉस्पिटलला येऊ शकते. सर्व हॉस्पिटलस्नी या गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे की, पिडीत व्यक्तीने स्वतःहून वैद्यकिय मदत व उपचाराकरता हॉस्पिटलला येणे फार मोलाचे आहे व अशा वेळी फक्त पोलिसांकडून परवानगी मिळाली नसल्याच्या कारणावरून वा प्रथम खबरी अहवाल दाखल न केल्याच्या कारणावरून सदर व्यक्तीवर उपचार करण्यास हॉस्पिटल किंवा संबंधित वैद्यकिय अधिकारी/डॉक्टर नकार देऊ शकत नाहीत. (फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३५७ क)

- लैंगिक अत्याचार पिडीत व्यक्तींना मदत करणा-या/मदत करू इच्छिणा-या व्यक्तींनी हे लक्षात घ्यावे की, आरोग्य कर्मचा-यांनी सदर व्यक्तीचे परिक्षण करताना त्यांनी न्याय वैद्यक व उपचारात्मक अशी दुहेरी भुमिका निभावणे अपेक्षित असते.

- तातडीची वैद्यकिय मदत व प्राथमिक मानसोपचार हे डॉक्टरांच्या उपचारात्मक भुमिकेचा अविभाज्य भाग आहे. वैद्यकिय मदतीमध्ये जखमा, व्रण, रक्तस्त्राव, संसर्ग थांबवण्याकरता औषधे, लैंगिक संबंधातून पसरणारे आजारांकरता वैद्यकिय चाचण्या (ज्यात एच.आय.व्ही.चा ही समावेश आहे), तातडीचे संततीनियमनाचे साधन (emergency contraception), गर्भपाताकरता वैद्यकीय मदत मिळवण्यात उशीर झाल्याने गर्भ धारणेचे मुल्यांकन करणे या सर्व गोष्टींचा समावेश होतो. प्राथमिक मानसोपचारामध्ये पिडीत व्यक्तीला झालेल्या प्रकारात तिची/त्याची काही चूक नसून सदर प्रसंग म्हणजे चुकिच्या पद्धतीने स्वतःच्या ताकदीचे प्रदर्शन करणे आहे, हे त्यांना पटवून देणे खूप गरजेचे असते. या प्राथमिक मानसोपचारामध्ये सदर व्यक्तीला अत्याचारा विषयीच्या तिच्या मनातील भावना प्रकट करणे व त्यांना सामोरे जाणे याकरता प्रोत्साहन दयायला हवे. आत्महत्येच्या विचारांपासून सदर व्यक्तीला परावृत्त करणे हा ही प्राथमिक मानसोपचाराचा एक अविभाज्य घटक आहे. (या संदर्भात आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने लैंगिक हिंसा पिडीत व्यक्तीच्या न्यायवैद्यक काळजीसाठी राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्व व शिष्टाचार जारी केले आहेत http://www.mohfw.nic.in/showfile.php?lid=2737)



भरला जातो. (५.१.१४ सर्वसमावेशक योजना )

- बलात्काराच्या केसची नोंद झाल्यानंतर संबंधित पोलिस ठाण्यातील एस. एच. ओ. (Station house officer) यांनी ७२ तासांच्या आत प्रथम खबर अहवालाची प्रत, वैद्यकिय तपासणीचा अहवाल व प्राथमिक तपासाचा अहवाल (आय. ओ.) संबंधित केसचा तपास करणा-या पोलिस अधिकारी यांच्या मार्फत मनोधैर्य योजनेकरता नियुक्त जिल्हा निहाय समितीकडे पाठवले जाते. (५.१.१५ सर्वसमावेशक योजना )

- अर्ज मिळाल्यानंतर व बलात्काराचा गुन्हा घडलेला असल्याच्या प्राथमिक माहितीची खात्री पटल्यावर जिल्हा निहाय समितीकडून पंधरा दिवसांच्या आत व जास्तीत जास्त ३ आठवडयांच्या आत २0,000/ रूपये पिडीत व्यक्तीला दिले जावेत. पिडीत महिलेची गरज लक्षात घेऊन बोर्ड योग्य अशा आधार सुविधा व जास्तीत जास्त २0,000/ रूपये प्रत्येक केस मध्ये देऊ शकते. (५.१.१६ सर्वसमावेशक योजना)

- ज्या दिवशी पिडीत व्यक्ती फौजदारी खटल्याच्या सुनावणीत पुरावे/जबाब सादर करते किंवा प्रथम खबर अहवाल नोंदवल्यापासून एका वर्षाच्या आत (जर फौजदारी खटल्याच्या सुनावणीत पुरावे/जबाब सादर करण्याचा कालावधी पिडीत व्यक्तीच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे लांबत असेल तर) यापैकी जो कालावधी जवळचा असेल त्या कालावधीत एका महिन्याच्या आत १,00,000 / रूपये एक लाख इतकी रक्कम जिल्हा निहाय समितीकडून पिडीत व्यक्तीला देण्यात यावी. (५.१.१७ सर्वसमावेशक योजना)

- पिडीत व्यक्तीकरता उपलब्ध असलेली आर्थिक मदत व आधार सुविधा दोन्ही मिळून सुमारे १,४0,000/(एक लाख चाळीस हजार रूपये) इतकी मदत त्या व्यक्तीला मिळते. (५.१.१७ सर्वसमावेशक योजना)

- काही विशेष केसेस मध्ये जेव्हा पिडीत व्यक्ती लहान मुलगी किंवा मानसिक/ शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्ती असते ज्यांना विशेष उपचार व काळजी करता जास्त पैशांची गरज लागू शकते किंवा अशा स्त्रिया ज्यांना लैंगिक संबंधातून पसरणारे आजार, एच. आय. व्ही./एड्स ची लागण झाली आहे किंवा ज्यांना गर्भ राहिला आहे अशा वेळी योजने अंतर्गत असलेली मदतीची एकूण रक्कम जिल्हा निहाय समितीच्या शिफारसीने किंवा सल्लामसलतीने राज्य बोर्डाकडून २,00,000 /(दोन लाख रूपये) इतकी वाढवली जाऊ शकते. (५.१.१८ सर्वसमावेशक योजना)

भूतकाळातील लैंगिक अनुभवांवर भाष्य करणे किंवा प्रश्न विचारण्यास परवानगी नाही भारतीय पुरावा कायद्यातील कलम १४६ च्या दुरूस्ती नुसार)

- लैंगिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण अधिनियम (POCSO) २०१२ मध्ये सांगीतल्या प्रमाणे मुलांसोबत घडलेल्या अत्याचाराच्या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायालयात होते. यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी जलद गतीने होण्यास मदत होते. (लैंगिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण अधिनियम २८ (१) नुसार) १८ वर्षाखालील सर्व पिडीतांच्या केसेस सदर कोर्टात चालतात. शिवाय तेथे मुलांकरता सोयीस्कर वातावरण निर्माण करता येते. कायद्याच्या दृष्टीने मूल जर दोषी असेल तर लहान मुलांकरता असलेल्या कोर्टात (जुविनाइल जस्टिस बोर्ड) अशा केसेसची सुनावणी होते. (लैंगिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण अधिनियम ३४ (१) नुसार)
- १८ वर्षावरील पिडीतांकरता शक्यतोवर महिला न्यायाधीश असावे असे निर्देश आहेत. शिवाय महाराष्ट्र सरकारने त्यात विषेश न्यायालयाची सोयही केलेली आहे. पण त्याची अंमलबजावणी सर्व ठिकाणी अजून झालेली नाही.
- विशेष न्यायालयांनी त्यांच्याकडील केसेसची सुनावणी १ वर्षाच्या आत पूर्ण करावी. याकरता १ वर्षाचा कालावधी मोजण्याकरता न्यायालयातील पहिल्या सुनावणीची तारीख लक्षात घेतली जाते. (लैंगिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण अधिनियम ३५ (२) नुसार)

### *नुकसान भरपाई*

- नुकसान भरपाई हा पिडीत व्यक्तीचा अधिकार आहे.
- महिलांचे संरक्षण व सशक्तीकरणाच्या सर्वसमावेशक योजनेअंतर्गत नुकसान भरपाई ही आर्थिक तरतूद तसेच समुपदेशन, आधारगृह, वैद्यकिय व कायदेशिर बाबींमध्ये मदत प्रशिक्षण व शिक्षण अशा विविध प्रकारच्या सुविधांच्या स्वरूपात मिळू शकते.
- प्रथम खबर अहवाल नोंदवल्यानंतर ६० दिवसांच्या आत आर्थिक सहाय्य व इतर सुविधांकरता अर्ज करता येतो. हा अर्ज पिडीत व्यक्तीला किंवा तिच्या वतीने तीचे कायदेशीर वारस, बालक किंवा मानसिक दृष्ट्या विकलांग असल्यास कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण करणारा कायदा २००५ अंतर्गत नेमलेल्या सुरक्षा अधिकारी यांच्याद्वारे



- न्याय वैद्यक प्रशिक्षण (Medico legal Examination) करणा-या व्यक्तीच्या भुमिकेत घडलेल्या घटनेची तपशीलवार माहिती घेणे, डोक्यावरील केसांपासून पायाच्या अंगठयापर्यंत संपूर्ण शरीराचे परीक्षण करणे, संबंधित पुरावे गोळा करणे व वैद्यकीय पुराव्याचा अर्थ लावणे या सा-याचा समावेश आहे.
- डॉक्टरांनी वैद्यकीय परीक्षण अहवालात योनी पटल (Hymen) पूर्वीच फाटलेला असल्याच्या खुणा, योनी मार्गाच्या मुखाचा आकार, काहीच संबंध नसलेला स्त्रीरोगाचा इतिहास (Obstetric history) (जसे भूतकाळातील गर्भपात, कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर) आणि लैंगिक संबंधाची सवय या बद्दल कुठलेही तपशिल देऊ नयेत किंवा त्या बद्दल कुठलेही विधान करू नये. (भारतीय पुरावा कायद्यातील कलम १४६)
- डॉक्टरांकडून तज्ञ साक्षीदार म्हणून कोर्टात सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये अत्याचाराला सामोरे गेलेल्या व्यक्तीच्या शब्दात घडलेल्या घटनेची तपशीलवार माहिती, गोळा केलेले पुराव्याचे तपशिल, जखमांची माहिती, अत्याचाराचा आरोग्यावर झालेला परिणाम व अत्याचार, परिक्षण व परिक्षणा दरम्यान गोळा केलेल्या पुराव्यांचा अर्थ लावणे या दरम्यान गेलेला कालावधी या सा-याचा समावेश असणे आवश्यक आहे. (कलम १६४ (अ) फौजदारी प्रक्रिया संहिता)
- परिक्षणा दरम्यान गोळा केलेल्या पुराव्यांचा अर्थ लावणा-या डॉक्टरांनी हे लक्षात घ्यायला हवे की अत्याचारानंतर अत्याचाराला सामो-या गेलेल्या व्यक्तीने केलेल्या काही क्रियांमुळे (जसे अंघोळ, लघवीला जाणे, कपडे बदलणे, योनीमार्ग किंवा संडासची जागा पाण्याने धुणे), अत्याचार करणा-या व्यक्तीने दिलेली धमकी, पिडीत व्यक्ती नशेच्या अंमलाखाली असताना करण्यात आलेला अत्याचार किंवा अत्याचाराचे स्वरूप यामुळे पुरावे उपलब्ध नसू शकतात किंवा नष्ट झालेले असू शकतात.
- बलात्कार (भारतीय दंड विधान ३७५) व लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO Act, 2012) ह्या कायदेशिर किंवा कायदयात वापरण्यात येणा-या संज्ञा असून त्या वापरण्याचा अधिकार न्यायलयास आहे. परिक्षण करणारे डॉक्टर या बाबत कुठलेही विधान करू शकत नाहीत किंवा निर्णय घेऊ शकत नाहीत.
- हॉस्पिटलकडून पिडीत व्यक्तीस वैदयकिय तपासणीचा अहवाल पूर्णपणे मोफत दिला गेला पाहिजे. हॉस्पिटलकडून सदर अहवाल आरोपीस दिला जाऊ नये, याची दोन कारणे आहेत.

१. सदर अहवाल हा पिडीत व्यक्तीचा वैदयकिय तपासणीचा अहवाल असून ही अत्यंत वैयक्तिक माहिती आहे, त्यामुळे माहितीच्या अधिकारातील कलम ८ अंतर्गत सुद्धा ही कागदपत्रे न देण्या करता सुट दिलेली आहे.

२. तरीही आरोपीस सदर अहवाल हवा असल्यास त्याला चार्जशीट फाईल झाल्यानंतर तो पोलिसांकडून मिळू शकतो.

**पोलिसः प्रथम खबर अहवाल ः (F.I.R.)**

- प्रथम खबर अहवाल म्हणजेच F.I.R. हा अहवाल म्हणजे घडलेल्या गुन्हयाबद्दल पोलिसांना दिलेल्या तपशिलवार माहितीचे लिखित स्वरूप असते. ही औपचारिक तक्रार असून याचा आधार घेऊन पोलिस तपासाला सुरूवात करतात. जी व्यक्ती गुन्ह्याची माहिती सर्व प्रथम पोलिसांना देते तिचे नाव व सहीने प्रथम खबरी अहवाल दाखल होतो. त्याची प्रत त्या व्यक्तीला देणे बंधनकारक आहे.

- प्रथम खबर अहवाल अत्याचाराला सामो-या गेलेल्या व्यक्तीने स्वतः नोंदवावी असे नाही. अत्याचाराला सामो-या गेलेल्या व्यक्तीच्या वतीने सदर व्यक्तीचे पालक, नातेवाईक व मित्र-मैत्रिण ही प्रथम खबर अहवाल साक्षीदार म्हणून नोंदवू शकतात.

- फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम १५४ नुसार पोलिसांना मौखिक किंवा लिखित स्वरूपात दिलेली दखलपात्र गुन्हयाशी[१] संबंधित माहिती प्रथम खबर अहवालात रूपांतरीत केली जाऊ शकते.

- पोलिसांना गुन्हयाची माहिती तोंडी किंवा लिखित स्वरूपात देता येते. जेव्हा माहिती तोंडी दिली जाते तेव्हा ती माहिती लिहून त्याचे तक्रारीत रूपांतरीत करणे ही पोलिसांची जबाबदारी असते. गुन्हयाची माहिती देणा-या व्यक्तीच्या जबाब तिच्याच शब्दात लिहिणे आवश्यक आहे. तक्रार व जबाब लिहून झाल्यावर माहिती देणा-या व्यक्तीस जी भाषा कळते त्या भाषेत समजावून सांगून त्यावर सही घेणे आवश्यक आहे. (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ (१))

---

[१] दखलपात्र गुन्हा म्हणजे असा गुन्हा ज्यात पोलिस न्यायालयाची परवानगी न घेता तपास सुरू करू शकतात व अटकपत्राविना (वॉरंटविना) आरोपीला अटक करू शकतात.



***न्यायालय ः***

- पोलिसांनी कोर्टात आरोपपत्र दाखल केल्यानंतर कोर्टाकडून खटल्याच्या सुनावणीची तारिख दिली जाते.

- सुनावणीची तारीख, सुनावणी जेथे होणार आहे त्या कोर्टाचे तपशिल, कोर्ट रूम नं इ. गोष्टी कोर्टाच्या समन्सद्वारे पिडीत व्यक्ती (व साक्षीदार) यांना कळवले जातात.

- साधारणतः तक्रारदार (किंवा ज्याने प्रथमखबर अहवाल नोंदवली ती व्यक्ती) पहिला साक्षीदार असते. त्यानंतर पिडीत व्यक्ती (जर तक्रारदार पिडीत व्यक्ती स्वतः नसेल तर) पिडीत व्यक्तीशी संबंधित व्यक्ती, पंच, वैद्यकिय परिक्षण ज्यांनी केले ते डॉक्टर, तपास करणारे पोलिस अधिकारी हे सरकारी पक्षातर्फे साक्ष देतात. नंतर आरोपीचा जबाब घेतला जातो. तसेच त्याला शपथेवर साक्ष द्यायची असल्यास तो देऊ शकतो. आरोपीतर्फे कुणी साक्षीदार असल्यास ते साक्ष देतात.

- पिडीत व्यक्तीची साक्ष इन कॅमेरा होते, याचाच अर्थ तेथे अनावश्यक व्यक्तींना प्रवेश नसतो. न्यायाधिश, सरकारी वकिल, आरोपी, आरोपीचे वकिल व न्यायालयातील कर्मचारी एवढीच माणसे उपस्थित असतात. (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२७ मधील बदलानुसार - २००८)

- खटल्याच्या सुनावणी दरम्यान साक्षीदारांना दोन्ही पक्षाच्या वकिलांकडून चौकशी करता बोलावले जाऊ शकते.

- न्यायालयीन जबाव हा (Statement) जबाब व उलट तपासणी यांनी तयार झालेला असतो.

- ज्या पक्षाकडून साक्षीदारांना तपासणीकरता बोलावले जाते तो पक्ष साक्षीदाराची सरतपासणी घेतो. जेव्हा विरूद्ध पक्ष साक्षीदारांना प्रश्न करतात तेव्हा त्याला उलट तपासणी असे म्हटले जाते. पिडीत व्यक्तीकरता सरकारी वकिलांनी केलेली तपासणी म्हणजे सरतपासणी व बचाव पक्षाकडून केलेली तपासणी म्हणजे उलट तपासणी होय.

- सरतपासणी वा उलट तपासणीत कुठल्याही तपासणी दरम्यान (Examination-in-chief किंवा cross examination) पिडीत व्यक्तीच्या अनैतिक व्यवहार किंवा

- जर २४ तासांत तपास पूर्ण झाला नाही तर आरोपीला दंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले जाते व आरोपीवरील आरोप योग्य असल्याचे आढळल्यास दंडाधिकारी आरोपीला १५ दिवसांपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश देऊ शकतात.
- या १५ दिवसांत पोलिसांना आरोपीचा तपासकामातील हस्तक्षेप किंवा त्याने पुरावे नष्ट करण्याची भिती न बाळगता तपास करता येतो.
- १५ दिवस पूर्ण झाल्यानंतर आरोपीला पुन्हा दंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले जाते व तपास पूर्ण झाला नसल्यास न्यायालयिन कोठडीचा आदेश दिला जातो.
- जर आरोपीने केलेल्या गुन्ह्याची शिक्षा १० वर्षाहून कमी असल्यास न्यायालयिन कोठडी ६० दिवसांपेक्षा अधिक असू शकत नाही व शिक्षा १० वर्षाहून जास्त असल्यास न्यायालयिन कोठडी ९० दिवसांपेक्षा अधिक असू शकत नाही.
- तपास प्रक्रिया सुरू असताना आरोपी कधीही जामिनाकरता अर्ज करू शकतो.
- एखाद्या व्यक्तीला ज्या गुन्ह्याच्या आरोपाखाली अटक केली आहे त्यासाठी असलेली शिक्षा जर ७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर त्यांच्या जामिनाचा अर्ज दंडाधिकारी न्यायालय फेटाळते व सत्र न्यायालयात अर्ज करण्यास सुचवते.
- पिडीत व्यक्तीला आरोपीला जामिन मिळू नये याकरता लढता येते. सरकारी वकिल[२] (शासनाकडून नियुक्त केलेला वकिल) किंवा संबंधित गुन्ह्याशी संबंधित पोलिस निरिक्षक यांच्याकडे याकरता अर्ज सादर करता येतो.
- पिडीत व्यक्तीला 'वॉचिंग ॲडव्होकेट' नेमण्याचा अधिकार आहे. पिडीत व्यक्तीने नेमलेला वॉचिंग ॲडव्होकेट पिडीत व्यक्तीला आरोपीने जामिनीकरता अर्ज कधी केला, आरोपपत्र कधी दाखल झाले, पहिली सुनावणी कधी आहे या संबंधी माहिती पिडीत व्यक्तीच्या ऐवजी न्यायालयात हजर राहून पिडीत व्यक्तीला देऊ शकतो.

---

[२] देशात घडणारा प्रत्येक गुन्हा कुठल्याही एका व्यक्तीच्या विरोधात नसून तो देशाच्या किंवा राज्याच्या विरोधातील गुन्हा आहे यामुळे पिडीत व्यक्तीच्या वतीने राज्यातर्फे केस लढली जाते. सरकारी वकिल हे न्यायालयात पिडीत व्यक्तीचे प्रतिनिधित्व करतात.



- प्रथम खबर अहवालाची प्रत मिळणे हा गुन्हयाची माहिती देणा-या व्यक्तीचा अधिकार असतो. (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ (२))
- लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात प्रथम खबर अहवाल वरिष्ठ पोलिस निरिक्षक किंवा वरिष्ठ अधिकारी यांच्या कडून नोंदविला जावा.
- अत्याचार पिडीत व्यक्ती स्त्री असेल व जर तीच गुन्हयाची माहिती देत असेल तर प्रथम खबर अहवाल महिला पोलिस अधिकारी किंवा कुठल्याही महिला अधिकारी यांच्याकडून नोंदविला जावा. (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४) महिला पोलिस अधिकारी उपलब्ध नसल्यास पुरूष पोलिस अधिकारी यांनी महिला हवालदाराच्या उपस्थितीत प्रथम खबर अहवाल नोंदवणे आवश्यक आहे.
- पोलिसांनी प्रथम खबर अहवाल नोंदवण्यास नकार दिल्यास अत्याचार झालेल्या व्यक्तीला मेजिस्ट्रेट कोर्टात जाण्याचा अधिकार आहे. हयानंतर कोर्टाकडून पोलिसांना प्रथम खबर अहवाल नोंदवण्याचा आदेश दिला जातो. (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३))
- प्रथम खबर अहवाल कुठल्याही पोलिस ठाण्यात नोंदवता येऊ शकतो. जेथे गुन्हा घडला तेथेच प्रथम खबर अहवाल नोंदवला जावा असे बंधनकारक नाही. ज्या पोलिस ठाण्यात प्रथम खबर अहवाल नोंदवला गेला असेल त्या पोलिस ठाण्याने जेथे गुन्हा घडला त्या संबंधित पोलिस ठाण्याकडे प्रथम खबर अहवाल पोहचवणे ही त्यांची जबाबदारी आहे. ह्याला झीरो एफ.आय.आर. (Zero FIR) असे म्हणतात. (मुंबई पोलिस कायदे पुस्तक भाग ३ - कायदा क्र.११९ अ)
- एकदा पोलिसांना घडलेल्या बलात्काराच्या गुन्हयाची माहिती दिल्यावर पिडीत व्यक्तीला योग्य वाटेल अशा ठिकाणी तिचा जबाब नोंदविणे/ घेणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. सदर ठिकाण म्हणजे पिडीत व्यक्तीचे घर, हॉस्पिटल किंवा इतर कुठलीही जागा असू शकते. पिडित व्यक्ती जबाब देत असताना त्या व्यक्तीची इच्छा असल्यास सोबत कुणी उपस्थित राहू शकते जसे, पालक, मैत्रिण किंवा पिडित व्यक्ती जबाब देत असताना एखादी व्यक्ती किंवा कुणीही नको असेल तर पिडीत व्यक्ती तसे ही सांगू शकते. (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५७ मधील दुरूस्तीनुसार)
- प्रथम खबर अहवाल नोंदवल्या नंतर गुन्हयाशी संबंधित साक्षी पुराव्यासाठी लोकांचे जबाब घेतले जातात.

- पोलिसांचा तपास पूर्ण झाल्यावर ते कोर्टात आरोपपत्र/ चार्जशीट दाखल करतात. प्रथम खबर अहवाल हा त्याचाच एक भाग असतो.

**प्रथम खबर अहवाल नोंदवल्या नंतर पिडीत व्यक्ती किंवा तिच्या परिवारास धमकी किंवा कुठल्याही गोष्टीचा धाक दिला गेल्यास**

- प्रथम खबर अहवाल नोंदवल्या नंतर पिडीत व्यक्ती किंवा तिच्या परिवारास धमकी दिली जाणे किंवा कुठल्याही गोष्टीचा धाक दाखवला जाण्याची शक्यता असते. अशा वेळी पिडीत व्यक्ती पोलिस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा नोंदवू शकते. याची नोंद चार्ज शीटमध्ये घेतली जाऊन पोलिसांनी यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

- पिडीत व्यक्ती पोलिसांना लिखित अर्ज देऊन स्वतःच्या व कुटुंबियांच्या जीवाला धोका असल्याचे सांगू शकते व पोलिस संरक्षण मिळण्याची मागणी करू शकते.

***पंचनामा ः***

- पंचनामा म्हणजे अटक, शोध व जप्तीच्या वेळी उपस्थित व्यक्तींचे जवाब होय.

- फौजदारी प्रकिया संहिता कलम १०० नुसार याकरता किमान २ पंच उपस्थित असणे बंधनकारक आहे. सदर पंच गुन्हयाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कुठलाही संबंध नसलेले प्रतिष्ठित व्यक्ती असावेत.

- ज्या ठिकाणी गुन्हा घडला त्या ठिकाणच्या पंचनाम्यास 'स्पॉट पंचनामा'(Spot Panchanama) म्हणजेच घटनास्थळाचा पंचनामा असे म्हणतात.

- जप्तीचा पंचनामा ः हा साधारणतः तेव्हा केला जातो जेव्हा आरोपीचे गुन्ह्याच्या वेळी अंगावर असलेले कपडे हे पुरावा म्हणून जप्त केले जातात.

- अटक पंचनामा ः आरोपीला अटक करण्यात येते तेव्हा सदर पंचनामा केला जातो.

***फौजदारी प्रकिया संहिता १६४ नुसार जबाब ः***

- पिडीत व्यक्ती किंवा कुठलाही साक्षीदार पोलिस तपास चालू असताना आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी दंडाधिकारी न्यायालयात (Magistrate court) त्यांचा जबाब नोंदवू शकतात. सदर जवाबाला कायद्याने कोर्टात पुराव्या सारखे महत्व असते. सदर जबाब नोंदवून घेण्याकरता पोलिसांना विनंती करता येते.



- सदर जवाब तपासाची प्रक्रिया सुरू असताना व कोर्टात आरोपपत्र दाखल करण्याआधी नोंदवला गेला पाहिजे.

- गुन्हा घडल्यापासून ते केस कोर्टात सुनावणीला येई पर्यत मध्ये बराचसा वेळ गेलेला असतो. अशा वेळी पिडीत व्यक्ती विशेषतः जर पिडीत व्यक्ती लहान मूल असेल तर घडलेल्या गुन्हयाचे बारीक तपशिल विसरण्याचा संभव असतो. या कारणास्तव सदर जबाब नोंदवणे कधीही फायदेशीर ठरते.

***आरोपपत्र ः***

- आरोपपत्र हा पोलिसांनी तपासाअंती कोर्टात सादर केलेला अंतिम अहवाल असतो.

- आरोपपत्र हे संबंधित पोलिस निरिक्षकाकडून न्यायमूर्तींना दखलपात्र गुन्हयाची तपासादरम्यान मिळालेल्या पुराव्यासहित दिलेल माहिती असते. तसेच यातून संबंधित पोलिस निरिक्षक न्यायालयाला घडलेल्या गुन्हयाची योग्य प्रकारे चौकशी करता यावी याकरता तपासादरम्यान मिळालेले पुरावे व आवश्यक माहिती पुरवतात. (के.वीरास्वामी विरूद्ध भारत सरकार (Union of India) - (१९९१) ३ SCC ६५५)

- फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ नुसार, आरोपपत्रात पुढील गोष्टींचा समावेश असतो आरोपीचे नाव, माहितीचा प्रकार, गुन्ह्याची माहिती असणारे लोक (साक्षीदार ज्यांना कोर्टात साक्षकामी बोलाविण्यात येणार आहे), गुन्हा (आरोपीवर असलेल्या आरोपावरून लावण्यात आलेली कलमे), पोलिसांना गुन्हा घडला असे वाटते आहे का? जर हो तर कुणाकडून?

- आरोपपत्रामुळे आरोपी गुन्हेगार आहे यावर शिक्कामोर्तब होत नाही.

- प्रथम खबर अहवाल नोंदवल्यानंतर साधारणतः ९० ते १२० दिवसांमध्ये कोर्टात आरोपपत्र सादर केले जाते. काही विशेष खटल्यांमध्ये हा कालावधी वाढवण्यात येतो. जसे, आरोपी पळून गेला असेल किंवा अनोळखी असेल तर असे करता येते.

***पोलिस कोठडी, न्यायालयिन कोठडी व जामिन ः***

- आरोपीला अटक केल्यानंतर कारागृहात ठेवले जाते त्यानंतर २४ तासाच्या आत त्याला दंडाधिकारी यांच्यासमोर हजर करणे आवश्यक असते.